# भूमिगत मेट्रोजवळ मूळ जागी २,६०० झाडे

## पर्यावरण दिनानिमित्त 'एमएमआरसी'चा निर्णय

पृथ्वी रक्षण



> "एमएमआरसी' वृक्षारोपण पूर्ण करण्यासाठी कटिबद्ध आहे. विविध स्थानकांवर बांधकाम उपक्रम पूर्ण झाल्यावर आणि अधिक जागा उपलब्ध झाल्यावर वृक्षारोपण केले जाईल. सरकारी अथवा खासगी आस्थापना, परिसरमालक, सहकारी गृहनिर्माण संस्था आदींनीदेखील त्यांच्या जागेत वृक्षारोपणासाठी पुढे यावे.
>
> – **आर. रमणा**, संचालक, 'एमएमआरसी' (नियोजन)

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई

आरे ते कफ परेड या भूमिगत मेट्रो-३जवळ मूळ जागी दोन हजार ६०० झाडांचे रोपण होणार आहे. जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने ही मेट्रो मार्गिका विकसित करणाऱ्या मुंबई मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनने (एमएमआरसी) हा निर्णय घेतला आहे.

कुलाबा-वांद्रे-सीप्झ अशी ओळख असलेल्या मेट्रो-३ या मार्गिकेसाठी आरेसह काही ठिकाणी झाडांची कापणी करावी लागली होती. त्या पार्श्वभूमीवर 'एमएमआरसी'ने उच्च न्यायालयाकडे हमीपत्र सादर केले होते. त्यानुसार या मार्गिकेच्या मेट्रो स्थानकांवर व शेजारच्या भागात सुमारे दोन हजार ६०० झाडे लावण्याची हमी देण्यात आली आहे. त्यानुसार 'एमएमआरसी'ने मूळ जागी वृक्षारोपण करण्यासाठी तीन कंत्राट दिले आहेत. निवडलेले कंत्राटदार रोपवाटीकेत रूजलेल्या झाडांचा पुरवठा, लागवड आणि देखभाल करतील. स्थानकांचे बांधकाम पूर्ण झालेल्या ठिकाणी या झाडांची मूळ जागी लागवड नुकतीच सुरू झाल्याचे 'एमएमआरसी'ने सांगितले.

दरम्यान, 'एमएमआरसी'ने सीप्झ, एमआयडीसी, शीतलादेवी दादर, सिद्धिविनायक, सायन्स म्युझियम, महालक्ष्मी, मुंबई सेंट्रल, सीएसएमटी, चर्चगेट, विधान भवन आणि कफ परेड या १३ मेट्रो स्थानकांजवळ ५००हून अधिक झाडे आतापर्यंत लावली आहेत. निवडलेल्या झाडांमध्ये फुलांची, शोभेची, सदैव हिरवीगार सात वर्षे वयाची आणि सर्वसाधारण १५ फूट उंचीची आहेत. मूळ जागी वृक्षारोपण मोहिमेसाठी निवडलेल्या वृक्षांच्या प्रजातींमध्ये महोगणी, बकुळ, पिंपळ, सोनचाफा, निलमोहोर, तामण, कदंब, देशी-बदाम, आकाश-नीम, स्पाथोडिया, ताबेबुया, अम्ब्रेला-वृक्ष, सप्तपर्णी, पिंपळ, पांगारा, जंगली बदाम, चाफा यांचा समावेश आहे.